# ब्रिक्स शिखर-परिषदेचे फलित काय?

**चन्द्रशेखर पुरन्दरे**

ब्रिक्स ही पाच देशांची संघटना आहे - ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका. (त्यांच्या इंग्रजी आद्याक्षरांनुसार BRICS). तिची स्थापना २००६ ला झाली. जागतिक बँक, आंतर-राष्ट्रीय नाणेनिधी(IMF), जागतिक व्यापार संघटना (WTO) या जागतिक अर्थ-संस्था पश्चिम-केंद्रित आहेत. आज जागतिक बँकेचा अध्यक्ष अमेरिकन असला तर नाणे-निधीचा अध्यक्ष युरपिअन असतो ही रीत आहे. त्यामुळे साहजिकच तिसऱ्या जगाकडे दुर्लक्ष होते. ते व्यवस्थात्मक झालेले आहे. आर्थिक सत्तेबरोबर येणारे पश्चिमेचे राजकीय प्रभुत्व कमी व्हावे हाही उद्देश होता. या संस्थांना पर्याय नव्हे तर त्यांची धोरण-दिशा बदलणे हा हेतू. जागतिक व्यापारातील या देशांचा सहभाग १९९५ साली साडे-तीन टक्के होता, तो २०१०ला १५ टक्के झाला. यावरून त्याचे वाढते महत्त्व लक्षात यावे. आजमितीला या पाच देशात जगाची ४३ टक्के लोकसंख्या येते आणि जगाच्या एकूण उत्पन्नाच्या सुमारे एक-पंचमांश उत्पन्न या पाच देशांचे मिळून आहे.

ब्रिक्सची पहिली शिखर-परिषद २००९ ला रशियात झाली. त्यानंतर दरवर्षी अशा परिषदा होतात. यावेळची आठवी परिषद गोव्यामध्ये झाली.

**सभासद देशांची आर्थिक व राजकीय परिस्थिती**

चीनची आर्थिक वाढ मंदावली आहे तरीही भारतासारखी ७-८ टक्के आहे , त्यानंतर बऱ्याच फरकाने द.आफ्रिका. ब्राझील व रशिया आर्थिक संकटात आहेत. चीनचा एकट्याचा सहभाग ब्रिक्समध्ये ६० टक्केहून अधिक आहे. चीन प्रामुख्याने निर्यातीवर अवलंबून आहे. ती निर्यात बहुतांशी उत्पादन क्षेत्रात आहे - ९० टक्केहून जास्त. भारताच्या निर्यातीत उत्पादनाबरोबर (६६%) खनिजे व शेतीमालाचा समावेश आहे. रशिया, द.आफ्रिका व ब्राझीलच्या निर्याती खनिजे, तेल, शेत-माल या आहेत. परदेशी, म्हणजे प्रामुख्याने पाश्चात्त्य भांडवल गुंतवणूक (रशिया सोडता - त्याची कारणे निराळी) सर्वांनाच हवी आहे. आणि निर्यातीत वाढ. त्यासाठी ब्रिक्स.

राजकीयदृष्ट्या चीन व रशिया लोकशाही नाहीत. त्यामुळे तेथे अंतर्गत वैध विरोधाला वाव नाही. तसेच ते दोन देश अमेरिकेशी संघर्षातही आहेत.चीन व्यापारी संघर्षात तर रशिया छद्म-लष्करी संघर्षात. इतर तीन देश लोकशाही आहेत. द. आफ्रिका देशाचे नेतृत्व भ्रष्टाचारी आहे आणि अलिकडच्या निवडणुकात सत्ताधारी पक्षाची मोठी पीछेहाटही झाली आहे. ब्राझीलचे परवापर्यंतचे नेतृत्वही भ्रष्टाचाराच्या आरोपांमध्ये अडकले आहे.भारतात सध्याच्या सरकारविरुद्ध निदान आर्थिक गैर-व्यवहारांचे आरोप त्या प्रमाणात नाहीत. ही जमेची बाजू.

या पाच देशात भारताचे दरडोई उत्पन्न सगळ्यात कमी आहे आणि सामाजिक निर्देशांकावरही (अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, प्रसूतीतील मृत्यू, इत्यादी) भारत सगळ्यात तळात आहे. संघटना म्हणून आंतरराष्ट्रीय कायदा व मानवी हक्कांबाबत संयुक्त राष्ट्र-संघटनेचे वर्चस्व औपचारिकरीत्या मान्य आहे. पण रशिया, चीन व ब्राझीलमध्ये मानवी हक्कांचे सर्रास उल्लंघन होते. संघटना म्हणून टिकून रहाण्यासाठी अशा गोष्टींकडे काणाडोळा करण्यात येतो. थोडक्यात ही संघटना या ना त्या मुद्द्यांवर सदोष राजकीय व्यवस्था असणाऱ्या व असमान आर्थिक वाढीच्या देशांची आहे.

त्यांचे आंतरराष्ट्रीय प्राधान्यक्रमही निराळे आहेत. रशियाला सध्या मध्य-पूर्वेत राजकीय वर्चस्व हवे आहे आणि शक्य तेवढा युरोप दुबळा करायचा आहे. चीनला जगात आर्थिक वर्चस्व हवे आहे आणि तैवान, तिबेट, तद्देशीय मुस्लिमांना दडपणे याची आंतरराष्ट्रीय चर्चा नको आहे. तोच प्रकार तेथील व ब्राझीलमधील पर्यावरणाच्या हानीचा.

**ब्रिक्सचे महत्त्व व भारताचा कमकुवतपणा**

या परिस्थितीत एकमेकातील व्यापाराची वाढ हेच उद्दिष्ट शक्यतेच्या कोटीत रहाते. ही वाढही अर्थात जागतिक अर्थ-कारणावर अवलंबून आहे. संघटना स्थापन केली म्हणजे जागतिक व्यापारापासून फारकत तर होत नाही. ती यातील कोणत्याही देशाला परवडणारी नाही. किंबहुना, विकसित देशांशी सौदेबाजी करण्याची क्षमता वाढते. उदा. WTOच्या जागतिक बाजाराच्या तरतुदी बदलणे ब्रिक्स ही संघटना असल्याने शक्य झाले. एकेका देशाला ते तितके सोपे झाले नसते.

पश्चिमेच्या प्रभुत्ववादाला आळा या दृष्टीने ही संघटना महत्त्वाची आहे. विशेषत: आज अमेरिका व युरोप यांची वार्षिक उत्पन्नातील वाढ ० ते ०.५% असताना या देशांची गेल्या तीन वर्षांतील संयुक्त वाढ ५% हून जास्त आहे. त्यांनी अमेरिका/युरोपला

समृद्ध करण्याऐवजी एकमेकातील व्यापार वाढवणे इष्ट आहे.ते घडतही आहे. २००५ पासून २०१५ पर्यंत BRICS देशांचा एकमेकांशी व्यापार काही पटीत वाढला. ही वाढ सुलभ करण्यासाठी BRICS बँक अस्तित्वात आली. गोव्याच्या संमेलनात आर्थिक सहकाराचे इतरही निर्णय घेण्यात आले. पुढच्या काही वर्षात या पाच देशांत मुक्त-व्यापाराची योजना मागच्या शिखर परिषदेत पुढे आली. युरोपिअन युनिअन किंवा NAFTA (अमेरिका खंडातील देशांची संघटना) - यांच्यासारखा हा प्रकल्प असेल. त्यामुळे या पाच देशात माल, तंत्रज्ञान,मनुष्यबळ यांची देवघेव सोपी होईल. यावर चीनचा भर आहे कारण चीनला उत्पादन क्षेत्र वाढवण्यासाठी इतर देशांतून कच्चा माल हवा आहे आणि तयार मालाला बाजारपेठही. जगातील अशा इतर मुक्त व्यापार संघटनांशी चीनचे जगभर २७ करार आहेत तर भारताचे ३४. हा उत्साह भारताला महागात पडला आहे कारण आपली आयात समजा,जपानकडून होत असली, तर आयात कर कमी केल्याने, जपान त्यांचा माल पाठवतो. पण आपली जपानला होणारी निर्यात अगदीच कमी प्रमाणात वाढलेली दिसते. त्यामुळे इतर देश त्यांच्या संघटनांमध्ये, द्विपक्षी करारांसाठी आपले स्वागतच करतात. उदा. मलेशिया, न्यूझीलंड, वगैरे अनेक. हाच प्रकार ब्रिक्सबाबत संभवतो. म्हणजे आपण ना चीनचा धूर्तपणा दाखवत, ना ब्राझील, द.आफ्रिकेचा सावधपणा.

**ब्रिक्सच्या मर्यादा**

नेहरू - नासर (इजिप्त) - सुकार्णो (इंडोनेशिया) काळात अमेरिका-रशियाच्या संघर्षात न पडणारी अलिप्त देशांची अशीच संघटना निर्माण झाली होती पण तिचा अनियंत्रित विस्तार आणि संदिग्ध उद्दिष्टे यामुळे ती बळ धरू शकली नाही. त्यामानाने ही संघटना अधिक लक्ष्य-केंद्रित वाटते. पण नुसती आर्थिक वाढ तळापर्यंत दीर्घकाल यश देवू शकत नाही. परिषदेच्या शेवटच्या प्रसृत पत्रिकेत वर म्हटलेल्या राजकीय, सामाजिक त्रुटींवर मौन दिसते. जागतिक शांततेचा पुरस्कार, दहशतवादाची व भ्रष्टाचाराची शाब्दिक निर्भत्सना, WTO/आंतर-राष्ट्रीय कायदा मान्य , वगैरे औपचारिक, बोलायचे मुद्दे आहेत. एकूण ११० मुद्द्यांपैकी पुनर्वापर करता येणाऱ्या उर्जेच्या प्रकल्पांना मदत, नागरी वापरासाठी अणु-ऊर्जेला प्रोत्साहन, IMF च्या नियामक मंडळावर आशिया-आफ्रिका यांचे प्रतिनिधी असावेत ही मागणी हे त्यातल्या त्यात महत्त्वाचे.

भारताशेजारच्या देशांची अशीच संघटना आहे. त्यात नेपाळ, मियान्मार, भूतान, बांगलादेश, श्रीलंका, थायलंड हे देश आहेत. तेही या परिषदेला विशेष पाहुणे होते. त्यामुळे भारताचा प्रादेशिक प्रभाव वाढायला मदत होणे शक्य आहे. त्याचबरोबर पाकिस्तानला एकटे पाडण्याचा प्रयत्न आहे.

ब्रिक्सच्या स्थापनेनंतर काही काळ अशी आशा होती की त्यामुळे अविकसित देशांतील व्यापार वाढेल. वस्तुत: तसे झाल्याचे दिसत नाही. वाढ झाली पण प्रामुख्याने चीनच्या वसाहतवादाच्या दिशेने. भविष्यासाठी हे स्वागतार्ह नाही, त्यात आपला (चीननंतरचा मोठा देश) वर उल्लेखलेला बोटचेपेपणा.

**ब्रिक्सबाबत जागतिक मत**

अमेरिकन वृत्तपत्रांच्या मते दहशतवादाविरुद्धची भारताची भूमिका ब्रिक्सने मान्य केली. मोदी म्हणतात ते ब्रिक्स शब्दश: स्वीकारणार नाहीत हे त्यांना व भारत सरकारला माहिती होते. तरीही पाकिस्तानला एकटे पाडण्याच्या धोरणात एक पाऊल पुढे पडले हे नक्की. पाकिस्तानमधून तेलाच्या वाहतुकीसारखे आपले हितसंबंध चीन कायम राखणार, हेही आधी माहिती होते. संमेलनातील कर-चुकवेगिरीवर कारवाई, विकास करताना पर्यावरणाकडे लक्ष देणे, शेतीवर संशोधन यावरील भरही नमूद केला आहे.

पाकिस्तानी मत भारतीय वृत्तपत्रांसारखेच आहे. जागतिक अर्थ-कारणावर परिणाम करू शकणाऱ्या या संमेलनात मोदींनी संकुचित मनाने प्रवेश केला व द्विपक्षीय मुद्दा पुढे आणला. त्यामुळे त्या संमेलनाने, विशेषत: चीनने पाकिस्तानकडे बोट दाखवायला नकार दिला. पाकिस्तानी वृत्तपत्रांनी भारत-रशिया लष्करी करार - भारताला क्षेपणास्त्रे देणे, भारतात लष्करी हेलिकॉप्टर तयार करणे, इ.- नमूद केले आहेत.

काही रशियन वृत्तपत्रांनुसार ब्रिक्स निष्प्रभ संघटना झालेली आहे. तर इतर पत्रांनुसार मोदी सरकारचे अमेरिकेकडे झुकणे चीनला पसंत नाही. त्याबाबत मोदींनी सावध भूमिका घेतली. जगातील सिरिया सारख्या देशात राजवट उलथणे ब्रिक्सला मंजूर नाही असाही निष्कर्ष शेवटच्या प्रसृत पत्रिकेवरून काढण्यात आला आहे. म्हणजे पुतीनच्या भूमिकेचे समर्थन ब्रिक्सने केले.

**निरीक्षण**

शेवटी, आर्थिक वाढ म्हणजे देशांतर्गत कोणाची वाढ - ती समाजातल्या खालच्या थराची वाढ का टाटा-अंबानींची वाढ हा प्रश्नच हे देश टाळतात. उद्योग व सेवा-क्षेत्राची वाढ म्हणजे देशाची वाढ - त्यासाठी जास्तीत जास्त विकाऊ माल तयार करा, शेतीकडे दुर्लक्ष (त्या क्षेत्राचा शेवटच्या पत्रिकेत नाम-मात्र उल्लेख आहे) - हे गृहीत आहे तोपर्यंत, तळा-गाळापर्यंतचा खरा विकास होणार नाही.

*Email - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*